Estd. 1962
NAAC 'A++' Grade

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प रि प त्र क

१९/२०२१

विषय - कार्यालयीन उपस्थितीबाबत

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक १५ मार्च, २०२१.

२. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.कोरोना/२६२१/प्र.क्र.३०/मवि- १/५२६९ दि.१६ मार्च, २०२१

३. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/८९/२०२१ दि.१६/०३/२०२१

४. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थपना ८८४/ दि.१८ मार्च, २०२१, जा. क्र. आस्थापना/९८४ दि. ०१/०४/२०२१

५. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक २७ मार्च, २०२१.

६. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/९२/२०२१ दि.२७/०३/२०२१

७. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक ०४ एप्रिल, २०२१.

सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, कोविड-१९ संसर्गाचा वाढत असलेला प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने तातडीने काही उपाययोजना व सुचनांचे काटेकोर पालन करण्यासाठी उपरोक्त सदंर्भीय क्र.७ अन्वये आदेश प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार सदर आदेशामध्ये दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने विद्यापीठातील अधिविभाग, प्रशासकीय विभाग व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाकरिता खालील प्रमाणे निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ अधिविभाग व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकांनी ऑन लाईन अध्यापन सुरू ठेवावे.

२. विद्यापीठ व महाविद्यालयातील अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग तसेच, विद्यापीठ परीक्षा विभाग वगळता इतर सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागांतील विभाग प्रमुख यांनी अधिविभाग / विभागातील शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांपैकी **५०%** याप्रमाणे शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांना आळीपाळीने **(Rotation)** कार्यालयात बोलावून शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज करुन घेण्यात यावे. ज्या शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांना कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळेल त्यांनी घरी राहून **(Work from Home)** कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करु नये.

३. परीक्षेच्या कामकाजाकरिता विद्यापीठ परीक्षा विभागाकडून वेळोवेळी पारित होणारी परिपत्रके/आदेशानुसार सर्व संबधितांनी आवश्यकता ती दक्षता घेवून परीक्षेसंबधित कामकाजाची कार्यवाही करावी.

४. उपरोक्त संदर्भीय क्र. ७ मधील आदेशानुसार आठवडयाच्या प्रत्येक शनिवारी व रविवारी संपूर्ण लॉकडाऊन असल्याने विद्यापीठ कार्यालय, विद्यापीठ अधिविभाग तसेच विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये पूर्णपणे बंद राहतील.

५. जा. क्र. आस्थापना/९८४ दि.०१/०४/२०२१ रोजीच्या परिपत्रकामधील अ. क्र. २ ते ६ मधील निर्देश कायम राहतील.

६. सदरचे आदेश दि.३० एप्रिल, २०२१ पर्यंत लागू राहतील. तसेच संदर्भ क्र. ७ मधील लागू असलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ 995
दि. 05 APR 2021
प्रति,

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

Estd. 1962
NAAC'A' Grade

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प रि प त्र क

१८/२०२१

विषय - कार्यालयीन उपस्थितीबाबत

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक १५ मार्च, २०२१.

२. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.कोरोना/२६२१/प्र.क्र.३०/मवि- १/५२६९ दि.१६ मार्च, २०२१

३. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/८९/२०२१ दि.१६/०३/२०२१

४. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थपना ८८४/ दि.१८ मार्च, २०२१

५. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक २७ मार्च, २०२१.

६. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/९२/२०२१ दि.२७/०३/२०२१

सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, कोविड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव वाढत असलेने कोविड- १९ विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी आणि तातडीने काही उपाययोजना करण्यासाठी व काही सुचानांचे काटेकोर पालन करण्यासाठी उपरोक्त सदंर्भीय क्र.५ व ६ पत्राअन्वये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदर आदेशामध्ये दिलेल्या सुचनाच्या अनुषंगाने विद्यापीठातील अधिविभाग यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय तसेच प्रशासकीय विभाग यांच्या प्रशासकीय कामकाजाकरिता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. उपरोक्त संदर्भीय क्र. ६ मधील सुचनेनुसार अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी विभाग आवश्यकतेनुसार पूर्ण क्षमतेने सुरू राहतील. इतर प्रत्येक अधिविभाग / प्रशासकीय विभागातील विभाग प्रमुख यांनी अधिविभाग / विभागातील शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांच्या उपस्थितीबाबत कोविड-१९ प्रादुर्भाव व्यवस्थापनाच्या अनुषंगाने योग्यतो निर्णय घ्यावा. व त्याचा अहवाल आस्थापना विभागास सादर करण्यात यावा.

२. विद्यापीठ कार्यालयातील गर्दी कमी करण्यासाठी अभ्यागतांना तातडीच्या कामाशिवाय कार्यालयामध्ये प्रवेश करणेस परवानगी असणार नाही. ज्या अभ्यागतांना बैठकीसाठी बोलविण्यात आलेले आहे. त्यांच्या बाबतीत विभाग/कार्यालय प्रमुख यांनी संबधित अभ्यागतांना विशेष पास निर्गमित करण्यात यावेत

३. सुरक्षा विभागामार्फत पुढील दक्षता घेण्यात यावी. **अ)** मास्क परिधान केल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. (No Mask- No Entry), **ब)** कार्यालयात येणाऱ्या प्रत्येकाचे तापमान तपासण्यात यावे, **क)** ताप असलेल्या व्यक्तींना कार्यालयात प्रवेश दिला जाणार नाही, **ड)** प्रवेशव्दार मध्ये पुरेशा प्रमाणात हँड सॅनिटायझर ठेवणेत यावीत.

४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.स.का.), दि.११ जून, २०२० अन्वये ज्या कार्यालयातील उपस्थिती रोटेशनने नियंत्रित करण्यात आलेली आहे. अशा कार्यालयातील लॉकडाऊनच्या कालावधीत दिव्यांग शिक्षक/अधिकारी/सेवकांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट अनुज्ञेय असेल. संबधित शिक्षक/अधिकारी/सेवकांनी कार्यालयातील त्यांचेकडील महत्वाच्या व तातडीच्या कामकाजाचा निपटारा होणेसाठी मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी विभागास उपलब्ध करून दयावेत. तसेच अशा प्रकारे विभागात अनुपस्थित असणाऱ्या शिक्षक व अधिकारी/सेवकांचा अनुपस्थितीचा अहवाल पी. जी. आस्थापना / आस्थापना - १ विभागाकडे विभागप्रमुख मार्फत सादर करण्यात यावा.

५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:समय २०२०/प्र.क्र.४१/१८(र.स.का.), दि.२३ जूलै, २०२० अन्वये ज्या कार्यालयातील उपस्थिती रोटेशनने नियंत्रित करण्यात आलेली आहे. अशा कार्यालयातील गर्भवती महिला तसेच अवयव प्रत्यारोपण केलेले, थेरपी, इम्युनोसप्रेसिव्ह थेरपी घेत असलेले शिक्षक व अधिकारी /सेवक हे कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळण्यास पात्र असतील. त्यासाठी त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. संबधित शिक्षक/अधिकारी/सेवकांनी कार्यालयातील त्यांचेकडील महत्वाच्या व तातडीच्या कामकाजाचा निपटारा होणेसाठी मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी विभागास उपलब्ध करून दयावेत.

६. सदरचे आदेश दि.३० एप्रिल,२०२१ पर्यंत लागू राहतील.

तसेच वेळोवेळी संदर्भ क्र. ६ मधील लागू असलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. विलास डी. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/ 984
दि. 1 APR 2021
प्रति,

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.